महाराष्ट्र शासन

# शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव

श्री गुलाबराव देवकर अभियांत्रिकी महाविद्यालय परिसर,सिरसोली रोड, जळगाव -४२५००२

ईमेल-gacjalgaon@gmail.com www.gacjalgaon.in

जा.क्र.शाआमज/आस्था/प्राध्या./सह.प्रा./ जाहिरात/२१०२ /२०२० दिनांक – २१.१२.२०२०

## पाहीजेत

संदर्भ :- १. शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रं.एमईएस १५०८/प्र.क्रं.९४/०८/वैसेवा-१, दिनांक ७ सप्टेबर २०११
२. शासन पत्र वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र.आयुसे-०११९/ प्र.क्र.०५/आयु -१, दि.०४.०१.२०२०.
३. शासन पत्र वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र.आयुसे-०७२०/प्र. क्र.४१/आयु -१, दि.१७.१२.२०२०.

१) उपरोक्त संदर्भित शासन निर्णयान्वये निदेशित केल्यानुसार या महाविद्यालयातील विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील खालील रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने भरण्याकरीता विहीत अटी व शर्तीची पुर्तता करणा-या पात्र व इच्छुक उमेदवारांकडून दि.०५.०१.२०२१ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यन्त अर्ज मागविण्यात येत आहेत.(थेट मुलाखतीचा दिनांक ई-मेल पत्राव्दारे स्वतंत्ररित्या उमेदवारास कळविण्यात येईल)

२) रिक्त पदांचा प्रवर्गनिहाय तपशिल :

| विषय | प्राध्यापक | सहयोगी प्राध्यापक |
|---|---|---|
| | एकुण रिक्त पदे (खुला प्रवर्ग) | एकुण रिक्त पदे (खुला प्रवर्ग) |
| संस्कृत संहिता सिध्दांत | ०१ | ०१ |
| शारिररचना | — | ०१ |
| शारिरक्रिया | ०१ | ०१ |
| द्रव्यगुण | ०१ | ०१ |
| रोगनिदान | ०१ | ०१ |
| रसशास्त्र | ०१ | ०१ |
| स्वस्थवृत्त | ०१ | ०१ |
| अगदतंत्र | ०१ | ०१ |
| कौमारभृत्य | ०१ | ०१ |
| स्त्री-रोग व प्रसुतीतंत्र | ०१ | ०१ |
| **एकुण रिक्त पदे** | ०९ | १० |

| | | |
|---|---|---|
| १) | **वयोमर्यादा** | महाराष्ट्र राज्य शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ, दि.२६ जुलै, २०१३ अन्वये विहित केलेल्या सेवा प्रवेश नियमानुसार<br>प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदासाठी उमेदवाराचे वय ५० वर्षापेक्षा जास्त नसावे. |
| २) | **शैक्षणिक अर्हता** | अ) संविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबधीत आयुर्वेद विषयातील पदव्युत्तर पदवी.<br>ब) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.२८) या अधिनियमाच्या परीशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब, भाग-क मध्ये नमुद केलेल्या अर्हतापैकी एक अथवा भारतीय वैद्यक केंद्रिय वैद्यक परीषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय केंद्रिय वैद्यक परीषदेने वेळोवेळी निर्देशीत केलेली समतुल्य अर्हता. |

| | | |
|---|---|---|
| | | क) ज्या उमेदवारांचे आयुर्वेद विषयातील स्वतःचे मुलभुत संशोधन निबंध अथवा पुस्तके, प्रसिध्द झालेली आहेत अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.<br>ड) इंग्रजी, मराठी, संस्कृत आणि हिंदी या भाषेचे पुरेसे ज्ञान असावे म्हणजे त्यानुसार तो त्या भाषा सहजपणे लिहण्यास, वाचण्यास व बोलण्यास समर्थ असला पाहीजे. |
| ३) | **अनुभव** | अ) **प्राध्यापक** या पदासाठी संबधित आयुर्वेदाच्या विषयामध्ये एकूण दहा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आवश्यक असेल, त्यापैकी मान्यताप्राप्त संस्थेतून संबंधित आयुर्वेदाच्या विषयाचे सहयोगी प्राध्यापक (प्रपाठक) पदाचा किमान पाच वर्षे अध्यापनाचा अनुभव असणे आवश्यक राहील.<br>ब) **सहयोगी प्राध्यापक** या पदासाठी संबधित आयुर्वेदाच्या विषयामध्ये मान्यताप्राप्त संस्थेतून संबंधित आयुर्वेदाच्या विषयाचे सहाय्यक प्राध्यापक (अधिव्याख्याता) या पदाचा किमान पाच वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असणे आवश्यक राहील.<br>तसेच दोन्ही पदांसाठी संबधित उमेदवाराकडे भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद, नवी दिल्ली यांनी नवीन अध्यापक सांकेतांक (Permanent NEW CCIM TEACHER CODE) असणे आवश्यक आहे. |
| ४) | **मानधन** | अ) प्राध्यापक - प्रतिमाह रु.५०,०००/-<br>ब) सहयोगी प्राध्यापक - प्रतिमाह रु.४०,०००/- |
| ५) | **नियुक्ती कालावधी व इतर अटी** | १. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन किंवा आस्थापना मंडळाकडुन वा बदलीने तसेच अन्य प्रशासनिक कारणास्तव पात्र उमेदवार उपलब्ध होईपर्यन्त अथवा (३६४) दिवसांच्या कालावधीकरीता या पैकी जे अगोदर घडेल तो कालावधी राहील. मात्र कोणत्याही परिस्थितीत (३६४) दिवसानंतर खंड दिल्याशिवाय पुनः करार पध्दतीने नियुक्ती दिली जाणार नाही.<br>२. नियुक्तीसाठी बाहयशक्तीचा दबाव अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील.<br>३. सदर पदावर नियमीत उमेदवाराची नियुक्ती झाल्यास त्या तारखेस तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने केलेली नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.<br>४. नियमित नियुक्त आणि कार्यरत अध्यापकांप्रमाणेच उमेदवारांचे कामाचे तास राहतील.<br>५. करार पध्दतीवरील नियुक्त उमेदवारास राजिनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी (०३) महीन्याची आगाऊ नोटीस अधिष्ठातांकडे देणे बंधनकारक राहील. ते शक्य नसल्यास (०३) महिन्याच्या मानधनाची रक्कम शासकीय कोषागारात जमा केल्यानंतर त्याचा/तिचा राजीनामा मंजुर करता येईल.<br>६. करार पध्दतीवरील नियुक्ती केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा विभाग प्रमुख व अधिष्ठाता यांचेकडून नियमीतपणे घेण्यात येईल. असा आढावा असमाधानकारक असल्यास संबधीत उमेदवारांच्या नियुक्त्या पुर्वसुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठांताकडे राहतील.<br>७. करार पध्दतीच्या उमेदवारांस विभागातील नियमित कार्यरत वरिष्ठ अध्यापक तसेच अधिष्ठाता यांच्या नियत्रंणाखाली आपल्या पदाचे कर्तव्य व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील तसेच या उमेदवारांना नियमित अध्यापकांप्रमाणे काम करणे बंधनकारक राहील.<br>८. करार पध्दतीवरील नियुक्त अध्यापकांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदा-यावर विपरीत परीणाम होणार नाही याची दक्षता घेवुन खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास मुभा राहील. |

| | | |
|---|---|---|
| | | ९. करार पध्दतीवरील नियुक्त उमेदवारांना नियमीत नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही व न्यायालयातही करार पध्दतीची नियुक्ती कायम करण्याबाबतचा दावा करता येणार नाही. तसेच करार पध्दतीवरील काम केलेला कालावधी सेवानिवृत्तीच्या लाभासाठी विचारांत घेता येणार नाही.<br>१०. नियुक्ती आदेश मिळाल्यापासुन (७) दिवसाच्या आंत नियुक्तीच्या ठिकाणी रुजु न झाल्यास नियुक्तीवरील दावा आपोआप संपुष्टात येईल.<br>११. कार्यालयीन वेळेत खाजगी व्यवसाय करता येणार नाही. तसे आढळल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.<br>१२. शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पालन करणेसंबधीची तसेच कायम नियुक्तीसाठी न्यायालयात दावा दाखल न करणेसंबधीचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच शासन/सक्षम प्राधिकरण/कार्यालयाकडुन वेळोवेळी प्राप्त निर्देश/आदेशाचे पालन करणे संबंधितास बंधनकारक राहील.<br>१३. नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर फेरबदल करण्याचे किंवा रद्य करण्याचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राखीव आहेत.<br>१४. उमेदवार सध्या अन्य संस्थेत कार्यरत असल्यास संबंधित संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र तसेच उमेदवाराची निवड झाल्यास रुजु होते वेळी संबंधित संस्थेचे कार्यमुक्ती आदेश (Relieving Order) सोबत असणे आवश्यक राहील. |

तरी इच्छुक उमेदवारांनी www.gacjalgaon.in या वेबसाईट वर उपलब्ध करुन दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज भरुन, आवश्यक प्रमाणपत्राच्या सांक्षाकीत प्रतीसह अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, श्री गुलाबराव देवकर अभियांत्रिकी महाविद्यालय परिसर, सिरसोळी रोड, मोहाडी, जळगाव-४२५००२ या पत्यावर दिनांक ०५.०१.२०२१ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यन्त पोहोचतील या बेताने पाठवावेत. तसेच सदर अर्ज gacjalgaon@gmail.com या ई-मेलवर पाठविण्यात यावा. सदर अर्ज पाठवितांना लिफाफयावर " .................. ............. **(विषयाचे नांव व पदनाम) पदावरील करार पध्दतीने तात्पुरत्या नियुक्तीसाठी अर्ज"** असे ठळक अक्षरांत लिहावे. प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळी सांक्षाकित प्रमाणपत्राच्या मुळ प्रती सादर करणे आवश्यक राहील.

सही/-
(वैद्य.मिलिंद.भा.निकुंभ)
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव

# अर्जाचा नमुना
## महाराष्ट्र शासन
## शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगाव

पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवुन त्यावर स्वतः स्वाक्षरी करावी.

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,
जळगाव

विषय :- आपल्या महाविद्यालयातील ......................... या पदावर करार पध्दतीने ३६४ दिवसांच्या कालावधीकरीता नियुक्ती मिळणेबाबतचा अर्ज सादर करणेबाबत

संदर्भ:- आपली जाहिरात दिनांक...............

महोदय,
उपरोक्त संदर्भित जाहिरातीस अनुसरुन मी आपल्या महाविद्यालयातील .................... या पदावर करार पध्दतीने ३६४ दिवसांच्या कालावधीकरीता नियुक्ती मिळणेबाबतचा अर्ज सादर करीत आहे.
माझी संपुर्ण माहिती खालीलप्रमाणे आहे.

<table>
<tr><td rowspan="2">१)</td><td rowspan="2">संपुर्ण नांव</td><td rowspan="2">:</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>आडनाव</td><td>स्वतःचे नांव</td><td>वडीलांचे/पतीचे नांव</td></tr>
<tr><td>२)</td><td>नवीन अध्यापक सांकेतांक (Permanent NEW CCIM TEACHER CODE)</td><td>:</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>३)</td><td>पत्रव्यवहाराचा पत्ता</td><td>:</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>४)</td><td>भ्रमणध्वनी क्रमांक :</td><td>:</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>५)</td><td>ई-मेल :</td><td>:</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>६)</td><td>जन्म दिनांक</td><td>:</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td rowspan="2">७)</td><td rowspan="2">अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिनांकास वय</td><td rowspan="2">:</td><td>वर्ष</td><td>महीने</td><td>दिवस</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>८)</td><td>राष्ट्रीयत्व</td><td>:</td><td colspan="3"></td></tr>
</table>

९) शैक्षणिक अर्हता : बीएएमएस प्रथम वर्षापासुन सुरुवात करावी व सोबत सर्व वर्षाच्या सांक्षाकीत गुणपत्रीका जोडाव्यात :

| अ.क्रं. | बोर्डाचे/विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण केलेल्या परीक्षा | उत्तीर्ण केल्याचे वर्ष | प्राप्त टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २ | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १०) | अवगत असणा-या भाषा : (योग्य ठिकाणी (✓) अशी खुण करावी) | | | | |
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | संस्कृत | अन्य |
| | | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११) | कामाचा अनुभव : (प्रमाणपत्राच्या सांक्षाकीत प्रती जोडल्या असतील तरच ग्राहय धरला जाईल) | | | |
| | **अ.क्रं.** | **संस्थेचे नांव** | **धारण केलेले पद** | **अनुभवाचा कालावधी** |
| | १. | | | |
| | २. | | | |
| | ३. | | | |
| | ४. | | | |

| | |
|---|---|
| १२) | प्रकाशीत लेखांचा तपशिल (लेख्यांचा सांक्षाकीत प्रती जोडण्यात याव्यात) : |
| १३) | प्रकाशीत पुस्तकांचा तपशिल : |
| १४) | पुरस्कार मिळाले असतील तर त्याचा तपशिल (प्रमाणपत्राच्या सांक्षाकीत प्रती जोडण्यात याव्यात) |

| | | |
|---|---|---|
| १५) | अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा तपशिल : | |
| | १. | |
| | २. | |
| | ३. | |
| | ४. | |
| | ५. | |
| | ६. | |
| | ७. | |
| | ८. | |
| | ८. | |
| | ९. | |
| | १०. | |

उमेदवाराची स्वाक्षरी

(संपुर्ण नांवासहीत)

# प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती/कुमारी ............................................................ प्रतिज्ञापुर्वक नमुद करतो/करते कि, वर नमुद केलेली माहीती पुर्णतः खरी असुन ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या ठिकाणी कोणत्याही टप्यावर किंवा नियुक्तीनंतर रद्य करण्यात येईल आणि माझेविरुध्द कायदेशीर कार्यवाही होईल, याची मला जाणीव आहे. तसेच सदरची नेमणुक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी पध्दतीवर असल्यामुळे नियमीत नियुक्तीसाठी मला हक्क सांगता येणार नाही आणि जाहीरातीत उल्लेखीत कारणास्तव नियमीत नियुक्तीचा उमेदवार/महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन/आस्थापना मंडळाकडुन/बदलीने उपलब्ध झाल्यास माझी तात्पुरती स्वरुपाची कंत्राटी नेमणुक आपोआप रद्द होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : उमेदवाराची स्वाक्षरी

(संपुर्ण नांवासहीत)